भारत सरकार

विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# कृषि उत्पादन उपकर अधिनियम, १९४०

**(सन १९४० चा अधिनियम क्रमांक २७)**

[दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान]

# The Agricultural Produce Cess Act, 1940

**(Act No. 27 of 1940)**

**[ As in force on the 31st January, 2002 ]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
२००४

[ **किंमत : रु. ४.००** ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान असलेला दि ॲग्रिकल्चरल प्रोडयूस सेस ॲक्ट, १९४० याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक १, दिनांक २३ जानेवारी, २००३ यात पृष्ठ ४५ ते ४८ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता. आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २३ जानेवारी, २००३.

**सुभाष सी. जैन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Agricultural Produce Cess Act, 1940 as on the 31st January, 2002 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 12, dated 23rd January, 2003 on pages 45 to 48.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause *(a)* of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 23rd January, 2003.

SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

एच ४१३४-१ (१०३५-१-२००४)

# कृषि उत्पादन उपकर अधिनियम, १९४०

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. व्याख्या.

३. उपकर बसवणे.

४. अनुसूचीमधून वस्तू वगळण्याचा अधिकार.

५. उपकराचा परतावा व उपकरातून सूट.

५ क. सीमा शुल्क अधिनियम, १९६२ च्या विवक्षित तरतुदी लागू करणे.

५ ख. शास्ती.

६. परिषदेकडे उपकराचे प्रदान आणि परिषदेकडून उपकराचा खर्च.

७. स्थायी वित्त समिती.

८. राखीव निधी.

९. केंद्र सरकारचा नियम करण्याचा अधिकार.

अनुसूची.

# कृषि उत्पादन उपकर अधिनियम, १९४०

**(१९४० चा अधिनियम क्रमांक २७[1])**

(३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान)

[१५ एप्रिल, १९४०]

**[2][भारतीय कृषि संशोधन परिषदेसाठी] अधिक चांगली वित्तीय तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी [2][भारतीय कृषि संशोधन परिषदेला] ती ज्या उद्दिष्टांसाठी स्थापन करण्यात आली अशी, त्या संस्थेच्या संस्थापन समयलेखामध्ये नमूद करण्यात आलेली उद्दिष्टे पार पाडण्यासाठी अधिक चांगली वित्तीय तरतूद करणे आणि त्या प्रयोजनार्थ, विवक्षित वस्तूंवर, निर्यातीवरील सीमाशुल्काच्या रूपाने उपकर बसवणे इष्ट आहे, व त्याचे उत्पन्न उक्त परिषदेकडे जमा केले जाईल;

त्याअर्थी, याद्वारे खालीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, "कृषि उत्पादन उपकर अधिनियम, १९४०" असे म्हणावे. संक्षिप्त नाव व विस्तार.

(२) त्याचा विस्तार [3]* * * * * संपूर्ण भारतभर आहे.

२. या अधिनियमात, विषयाशी किंवा संदर्भाशी काही विसंगत नसेल तर,— व्याख्या.

[4][(क) [5]["आयुक्त"] याचा अर्थ, सीमाशुल्क अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५२) याचे कलम २, खंड (८) मध्ये व्याख्या केल्यानुसार सीमाशुल्क [5][आयुक्त], असा आहे, आणि]

(ख) "परिषद" याचा अर्थ, [2][भारतीय कृषि संशोधन परिषद], असा आहे.

३. (१) [6][भारता] कडून निर्यात केल्या जाणाऱ्या, अनुसूचीमध्ये अंतर्भूत असलेल्या सर्व वस्तू- उपकर बसवणे. वर, मूल्यानुसार अर्ध्या टक्का दराने सीमाशुल्क आकारण्यात येईल :

परंतु, भारतात उत्पादित करण्यात आलेल्या वस्तू नाहीत याबाबत [5][आयुक्ताचे] समाधान होईल अशा रीतीने सिद्ध झालेल्या वस्तूंवर उक्त सीमाशुल्क आकारण्यात येणार नाही.

(२) केंद्र सरकार, राजपत्रामधील [7]अधिसूचनेद्वारे, उक्त सीमाशुल्क आकारण्याच्या प्रयोजनासाठी अनुसूचीमध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही वस्तूचे टॅरिफ मूल्य निश्चित करील व त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही टॅरिफ मूल्यात फेरफार करील.

४. केंद्र सरकार, परिषदेशी पूर्व विचारविनिमय केल्यानंतर शासकीय राजपत्रातील [8]अधिसूचने- द्वारे असा निदेश देऊ शकेल की, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही वस्तू कलम ३ द्वारे सीमा शुल्क बसवण्याच्या अधीन असणे बंद होईल, आणि त्यानंतर जोपर्यंत अशी अधिसूचना अंमलात असेल तोपर्यंत, ती वस्तू अनुसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेली नाही असे मानण्यात येईल. अनुसूचीमधून वस्तू वगळण्याचा अधिकार.

---

१. १९६३ च्या विनियम ७ द्वारे पाँडेचरीला लागू करण्यात आला.

२. १९५० च्या अनुकूलन आदेशाद्वारे "कृषि संशोधन सार्वभौमिक परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

३. १९५६ चा अधिनियम ६२, कलम २ व अनुसूचीद्वारे "जम्मू व काश्मीर राज्य खेरीज- करून" हा मजकूर गाळला (१ ऑक्टोबर, १९५६ रोजी व तेव्हापासून).

४. १९७० चा अधिनियम ४०, कलम २ द्वारे मूळ खंड (क) ऐवजी दाखल केला.

५. १९९५ चा अधिनियम २२, कलम ८४ द्वारे दाखल केले (२६ मे, १९९५ रोजी व तेव्हा- पासून).

६. १९५६ चा अधिनियम ६२, कलम २ व अनुसूचीद्वारे "या अधिनियमाचा विस्तार असेल अशा प्रदेशा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

७. अशा अधिसूचनेसाठी पहा—भारताचे राजपत्र, १९४७, असाधारण, इंग्रजी पृष्ठ क्र. ६११.

८. अशा अधिसूचनेसाठी पहा—भारताचे राजपत्र, १९४० भाग एक, इंग्रजी पृष्ठ क्र. १३२३.

उपकराचा परतावा व उपकरातून सूट. ५. [1][केंद्रीय महसूल मंडळे अधिनियम, १९६३ (१९६३ चा ५४) खाली घटित करण्यात आलेले केंद्रीय उत्पादन शुल्क आणि सीमाशुल्क मंडळ] पुढील बाबीकरिता तरतूद करणारे नियम [2] त्या नियमात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अशा अटींवर करू शकेल,---

(क) जेव्हा वस्तू, भूमार्गाने निर्यात केल्या जातात आणि नंतर त्या भारतामध्ये आयात करण्यात येतात अशा वस्तूंवरील सीमाशुल्काचा परतावा, आणि

(ख) ज्या वस्तू नंतर भारतामध्ये आयात करावयाच्या आहेत अशा वस्तूंवरील सीमाशुल्काचे प्रदान न करता त्यांची भूमार्गाने निर्यात.

सीमाशुल्क अधिनियम, १९६२ च्या विवक्षित तरतुदी लागू करणे. [3][५क. सीमाशुल्क अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५२) व त्या खाली तयार करण्यात आलेले नियम व विनियम यांच्या तरतुदी तसेच शुल्काचा परतावा व शुल्कापासून सूट या संबंधातील तरतुदीसुद्धा केंद्र सरकारला या अधिनियमान्वये देय असलेल्या सीमाशुल्काची आकारणी व वसुली करण्यासंदर्भात जशा लागू होतात तशाच त्या, शक्यतो, अनुसूचीत समाविष्ट असलेल्या सर्व वस्तूंवर सीमाशुल्काची आकारणी व वसुली करण्यासंबंधात लागू होतील.

शास्ती. ५ ख. (१) जो कोणी---

(क) या अधिनियमाखालील कोणत्याही सीमाशुल्काचे प्रदान चुकवील ; किंवा

(ख) जी कोणतीही माहिती पुरवणे त्याचे कर्तव्य असेल अशी कोणतीही माहिती पुरवण्यात कसूर करील किंवा जी माहिती तपशिलात खोटी आहे किंवा त्याला जिच्या सत्यतेबाबत शंका आहे अशी माहिती पुरवील ; किंवा

(ग) [4][आयुक्त] किंवा कोणताही अधिकारी या अधिनियमाच्या किंवा त्याखाली तयार करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाखालील आपले कार्य पार पाडीत असताना त्यात अडथळे आणील,

तो सहा महिन्यांच्या कालावधीपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीची कारावासाची शिक्षा किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या रकमेचा दंड किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

(२) या अधिनियमाखाली संपरीक्षा करणारे कोणतेही न्यायालय असा निर्देश देऊ शकेल की, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या ज्या वस्तूसंबंधात या अधिनियमान्वये शिक्षापात्र अपराध घडला असल्याची त्याची खात्री झाली असेल ती वस्तू केंद्र सरकारकडे समपहृत केली जाईल आणि असा देखील निदेश देईल की, अशी वस्तू ज्यात ठेवली असेल ती सर्व पुडकी, आवेष्टने किंवा पात्रे आणि ज्या जलयानातून ती वाहून नेली जाईल असे प्रत्येक जलयान किंवा अन्य वाहन देखील केंद्र सरकारकडे समपहृत होईल.]

परिषदेकडे उपकराचे प्रदान आणि परिषदेकडून उपकराचा खर्च. ६. (१) या अधिनियमाखाली आकारलेल्या सीमाशुल्काचे उत्पन्न केंद्र सरकारकडून ते गोळा करण्यासाठी निश्चित करण्यात आलेला कर खर्च वजा करुन परिषदेला प्रदान करण्यात येईल.

(२) परिषदेला देय असलेली रक्कम केंद्र सरकारकडून सहा महिन्यांपेक्षा अधिक होणार नाही एवढ्या कालावधीच्या अंतराने प्रदान करण्यात येईल.

(३) परिषदेला प्रदान केलेल्या रकमेचा खर्च केंद्र सरकारकडून या संदर्भात तयार केलेल्या नियमाद्वारे ठरवून देण्यात आलेल्या मर्यादेच्या अधीन असेल.

स्थायी वित्त समिती. ७. (१) परिषद, स्थायी वित्त समिती स्थापन करील आणि परिषदेच्या नियामक मंडळावर [5][संसदेच्या सदस्यां] पैकी एका सदस्याची निवड करील, तसेच एक सदस्य हा केंद्र सरकारद्वारे नियुक्त करण्यात आलेला अधिकारी असेल.

(२) पोटकलम (१) च्या उपबंधाधीन स्थायी वित्त समितीच्या घटना, कार्ये व कार्यपद्धती ही केंद्र सरकारच्या पूर्व मान्यतेने परिषद निश्चित करील अशा रीतीने विनियमित करण्यात येतील.

राखीव निधी. ८. परिषद, आपला राखीव निधी केंद्र सरकारने, त्यासंदर्भात केलेल्या नियमानुसार उभारील व ठेवील.

---

१. १९७० चा अधिनियम ४०, कलम ३ द्वारे "केंद्रीय महसूल मंडळ" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

२. अशा नियमांसाठी पहा---भारताचे राजपत्र, १९४०, भाग एक, इंग्रजी पृष्ठ क्र. ५६५.

३. १९७० चा अधिनियम ४०, कलम ४ द्वारे दाखल केले.

४. १९९५ चा अधिनियम २२, कलम ८४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ मे, १९९५ रोजी व तेव्हापासून).

५. १९७० चा अधिनियम ४०, कलम ५ द्वारे "केंद्रीय विधानमंडळाचा प्रतिनिधी" या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

९. (१) केंद्र सरकार, परिषदेशी विचारविनिमय करून ह्या अधिनियमाची प्रयोजने पार- पाडण्यासाठी, राजपत्रामधील अधिसूचनेद्वारे नियम[1] करील. केंद्र सरकारचा नियम करण्याचा अधिकार.

(२) विशेषत: व पूर्वगामी शक्तींच्या सर्वसाधारणतेला बाध न पोचवता केंद्र सरकार, परिषदेला, प्रदान केलेल्या रकमेच्या खर्चाचे विनियमन करण्याबाबत आणि कलम ८ मध्ये उल्लेखिलेल्या राखीव निधी उभारणे, तो ठेवणे व त्याचे व्यवस्थापन करणे यासाठी तरतूद करण्याबाबत नियम तयार करील.

[2][(३) या अधिनियमाखालील केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि तो असा ठेवण्यात आल्याचे सत्र किंवा पूर्वोक्त क्रमवर्ती सत्र संपण्यापूर्वी जर त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम तशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल, किंवा प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही].

---

१. अशा नियमांसाठी, भारताचे राजपत्र, १९४०, भाग एक, इंग्रजी पृष्ठ १३५३ पहा.

२. १९७० चा अधिनियम ४०, कलम ६ द्वारे मूळ पोटकलम (३) ऐवजी दाखल केले.

## अनुसूची

(कलम ३ पहा)

१. हाडे.
२. राठकेस.
३. लोणी.
४. तृणधान्ये, तांदूळ व गहू ह्याखेरीज.
५. औषधिद्रव्ये.
६. ब्रशांसाठी तंतू.
७. मासे.
८. फळे.
९. तूप.
१०. कातडे, न कमावलेले.
११. खते.
१२. पेंड.
१३. कडधान्ये (डाळी).
१४. बी-बियाणे.
१५. चामडे, न कमावलेले.
१६. मसाल्याचे पदार्थ.
१७. तंबाखू, प्रक्रिया न केलेला.
१८. भाजीपाला.
१९. गहू.
२०. गव्हाचे पीठ.
[1][२१. मेंढ्या किंवा कोकरांची लोकर आणि प्राण्यांचे केस, मग ते साफ केलेले किंवा पिंजलेले असोत वा नसोत.]

---

१. १९७० चा अधिनियम ४०, कलम ७ द्वारे मूळ बाब २१ ऐवजी दाखल करण्यात आली.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई